नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

# DINBANDHU
## Gramin Vikas sanstha, Deori
## दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

ता.देवरी जि.गोंदिया.





# वार्षिक अहवाल
२०२३-२४

# प्रस्तावना

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेची संस्था नोंदणी सन-१८६० च्या अधिनीयम २१ अन्वये दि.२६ डिसेंबर २०१४ रोजी धर्मदाय संस्था म्हणुन सहाय्यक धर्मदाय निबंधक गोंदिया यांच्याकडे नोंदणीकृत झाली. दिनबंधु ग्रामीण विकास संस्था ही स्वयंसेवी सामाजीक संस्था असल्याने ना नफा-ना तोटा या तत्वानुसार ही संस्था सामाजिक क्षेत्रात जनसामान्यांसाठी विविध लोकाभिमुख कार्य करीत आहे.

आर्थिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षात प्रामुख्याने रोजगार व स्वयंरोजगार, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक, पशुसंवर्धन असे सामाजीक दायीत्व या विषयांवर संस्थेने कार्य केले आहे. या वर्षात संस्थेने या विषयांवर कार्य करत असतांना संस्थेला आता पर्यंत मिळालेल्या कार्याची फलश्रृती एका वेगळया रुपात दिसुन आली असल्याने संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांचा आनंद आणि उत्साह द्विगुणीत झाला आहे.

संस्थेच्या दिवसेंदिवस होत असलेल्या प्रगतीमागे जनसामांन्याकडुन मिळालेले सहकार्य आणि आशिर्वाद आहेत. ते उत्तरोत्तर निरंतर मिळत राहावे अशी संस्थेच्या विस्वस्त मंडळाकडुन प्रार्थना आहे.

"सेवेने अंगी सामर्थ्य येते ।
जे जे बोलाल तेची होते ।
हस्ते परहस्ते सर्वची होते ।
काम त्याचे ।।"

-

- ग्रामगीता

सप्रेम नमस्कार...

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेचा सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करत असतांना आम्हाला अतीशय आनंद होतो आहे त्याचे कारण असे की संस्था विविध क्षेत्रात सामाजीक उपक्रमाचे आयोजन करत असते परंतु या वर्षात कार्य करत असतांना काही विशिष्ट क्षेत्रात संस्थेला कार्य कराव लागल.

संस्था स्थापनेपासुन अनेक विषयात कार्य करत आलेली आहे. परंतु या आर्थिक वर्षात संस्थेचे प्रमुख लक्ष केंद्रीत कसलेले शिक्षण या क्षेत्रासोबत स्वच्छता, आरोग्य, रोजगार, सांस्कृतिक आणि इतर विविध सामाजिक क्षेत्रात समाजाची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी काय करता येईल अशा क्षेत्रात संस्थेनी या वर्षात कार्य केलेले आहे.

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था गत ६ वर्षापासुन विविध सामाजिक क्षेत्रात लोकहितार्थ करत असलेल्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक विभागाने घेतली असुन संस्था करत असलेल्या कार्याचा गौरव म्हणुन या वर्षात क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सन २०२०-२०२१ चा गोंदिया जिल्हा युवा पुरस्कार (संस्था) या पुरस्काराने सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्र देवुन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारासाठी संस्थेच्या वतीने मा.श्री.चिन्मय गोतमारे (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी गोंदिया आणि मा.श्री.घनश्याम राठोड जिल्हा क्रीडा अधिकारी गोंदिया यांचे विशेष आभार.

प्रत्येक वर्षात वेगवेगळया उपक्रमांना संस्थेला जनसामान्यांचे मिळणारे सहकार्य व प्रेम यात वाढ होत असुन आम्ही हाती घेत असलेल्या सर्व उपक्रमांना असाच प्रतिसाद मिळत राहील हीच अपेक्षा !

ग्रामसुधारणेचे मुलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र ।<br>
संघठन हेची शक्तीचे सुत्र । ग्रामराज्य निर्माण करी ।।

आपला विश्वासू

कुलदिप द. लांजेवार<br>
अध्यक्ष<br>
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

## संस्थेविषयी....

संस्थेचे नांव : दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र-२२६/१४ (गोंदिया), संस्था अधिनीयम, १८६० नियम २१ एफ-१८५६ (गोंदिया), मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० नियम २९

संस्थेचे पॅन क्रमांक : AADTD6124H

कार्यालयाचा पत्ता : C/o. श्री.दयारामजी लांजेवार, शेडेपार रोड, पंचशिल चौक, देवरी ता.देवरी, जि.गोंदिया ४४१९०१ (महा.)

संपर्क क्रमांक : ७२१८९४२६२६, E-Mail : dgvsdeori@gmail.com

वेबसाईट : www.dinbandhugraminvikassanstha.org

### संस्थेचे उद्देश :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मदत करणे.

२) सुशिक्षीत बेरोजगार ग्रामीण युवकांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

३) आदिवासी व इतर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणुन त्यांना स्पर्धा परिक्षेच्या संदर्भात सर्वतोपरी मदत करुन प्रशासकीय सेवेत रुजु होण्यासाठी सक्षम करणे.

४) ग्रामीण व नागरी क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी कृषि, आरोग्य, शिक्षण, मुलभुत अधिकार या सारख्या लोकाभिमूख विषयांवर जनजागृती करुन नागरीकांना विकासाच्या प्रवाहात आणणे.

### संस्थेची विशेषता :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दुर करण्यासाठी संस्था निरंतर मदत करीत आहे.

२) सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांसाठी संस्थेने अनेक रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले तसेच ते कार्य पुढेही सुरु राहील असे संस्थेचे ध्येय आहे.

३) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीसह योग्य तज्ञांचे मार्गदर्शन मिळवुन देण्यासाठी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

४) प्रशासनासोबत जनसामान्यांसाठी आयोजीत कार्यक्रमात संस्था नेहमीच सहभागी होवून यशस्वी कार्यक्रम करण्यासाठी सहकार्य करीत असते.

५) नैसर्गीक साधन संपत्तीचे जतन करणे तसेच शिक्षण, आरोग्य, जलसंवर्धन, ग्रामस्वच्छता या विषयांवर नियमीत मार्गदर्शन करीत राहाणे, जनजागृती करणे हे संस्थेचे प्रमुख कार्य आहे.

## सन्मान सत्कार्याचा :

### १) ''जिल्हा युवा पुरस्कार (संस्था) सन २०२०-२०२१:-

दि.०१ मे २०२३

स्थान :- पोलीस मुख्यालय, कारंजा (गोंदिया)

**आयोजनाचे उद्देश :**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत समाजातील युवक व सामाजिक संस्थांनी क्रिडा, शिक्षण, पर्यावरण, व्यसनमुक्ती, स्वच्छता या सारख्या युवकांच्या विकासाकरीता विविध सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक व संस्था यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी आणि युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण व स्वयंसेवा भावना जागृत होण्यासाठी आणि संस्थांना समाजकार्यासाठी प्रेरणा मिळावी या हेतुने दरवर्षी या विभागामार्फत ''जिल्हा युवा पुरस्कार'' दिला जातो.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.चिन्मय गोतमारे (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी गोंदिया.

मा.श्री.घनश्याम राठोड, जिल्हा क्रीडा अधिकारी, गोंदिया.






## आयोजनाचे साफल्यः

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सन-२०२०-२०२१ या वर्षाचा जिल्हयातील सर्व ग्रामीण आणि शहरी भागात युवकांसाठी व समाजातील इतर घटकांसाठी कार्य करत असणाऱ्या दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी या संस्थेला जिल्हा युवा पुरस्कार दिला गेला. या संस्थेला महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त होणे हे संस्थेच्या सामाजीक कार्याचे मोठे यश व अभिमानास्पद साफल्य आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांना संघटीत करुन शिक्षण, आरोग्य, सामाजिक जागरुकता, पर्यावरण संवर्धन तसेच विविध जनकल्याणकारी उपक्रम राबवून समाजाच्या विकासासाठी संस्थेने केलेल्या सातत्यपुर्ण प्रयत्नांची हि दखल आहे. या पुरस्कारामुळे संस्थेच्या कार्याला नवी ऊर्जा प्रेरणा मिळुन भविष्यातही युवकांच्या सहभागातुन समाजहिताचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प अधिक दृढ होईल.

## आरोग्य :

### २) आंतरराष्ट्रीय योगदिवस :

दि.२१ जुन २०२३

स्थान :- तालुका क्रिडा संकुल, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

तालुका क्रीडा संकुल समिती देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण व आदिवासी भागातील नागरीकांमध्ये योग, प्राणायम व ध्यान या बद्दल जागरुकता निर्माण करुन त्यांना दैनंदिन जिवनात योगाचा अवलंब करण्यास प्रेरीत करणे, आरोग्यदायी सवयी विकसीत करणे आणि समाजात सकारात्मक व निरोगी वातावरण निर्माण करणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाच्या माध्यमातुन युवकांमध्ये आरोग्याबाबत जागरुकता वाढवुन समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालणा देणे हा देखील संस्थेचा महत्वपुर्ण हेतु आहे.



## संस्थेचे कार्य

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.यादोराव पंचमवार, नगरसेवक देवरी.

मा.श्री.विलाश शिंदे, तालुका प्रतिनीधी, दैनीक लोकमत.

**आयोजनाचे साफल्य :**

तालुका क्रीडा संकुल समिती आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी तर्फे आयोजीत आंतरराष्ट्रीय योगदिन कार्यक्रम अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला, या पउपक्रमात मोठया संख्येने युवक, विद्यार्थी व नागरीकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून योगाचे महत्व जाणुन घेतले आणि प्रत्यक्ष योगाभ्यास केला. विषेशतः ग्रामीण व आदिवासी भागातील नागरीकांना योग, प्राणायाम व ध्यान यांचे आरोग्यासाठी असलेले फायदे समजुन घेण्याची संधी मिळाली. या उपक्रमामुळे नागरीकांमध्ये आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोण निमाण होऊन दैनंदिन जीवनात योगाचा अवलंब करण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे हा कार्यक्रम संस्थेच्या सामाजिक कार्याला बळ देणारा व समाजासाठी उपयुक्त ठरणारा ठरला.



## पर्यावरण संवर्धन :

### ३) वृक्षारोपण :

दि.०५ जुलै २०२३

स्थळ :- सार्वजनीक वाचनालय व अभ्यासिका केंद्र, देवरी

**आयोजनाचा उद्‌देश -**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सकाळ वृत्तपत्र समूह यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करुन समाजात हरित व स्वच्छ वातावरण निर्माण व्हावे यासोबतच नागरीकांना वृक्षांचे महत्व पटवुन देऊन अधिकाधिक वृक्ष लागवडीसाठी प्रोत्साहीत करणे, वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे, युवक, विद्यार्थी व नागरीकांमध्ये पर्यावणाबद्‌दल जबाबदारीची भावना निर्माण करणे हा या उपक्रमाचा आयोजनाचा उद्‌देश होता.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.नंदुप्रसाद शर्मा, तालुका प्रतिनीधी, दैनीक सकाळ,

मा.श्री.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी.



# संस्थेचे कार्य

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी आणि सकाळ वृत्तपत्र समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत वृक्षारोपन कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या संपन्न झाला या उपक्रमात युवक, विद्यार्थी व अन्य नागरीक, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन पर्यावरण संरक्षणाबाबत समाजात जागरुकता निर्माण झाली आणि वृक्षांचे महत्व नागरीकांपर्यंत पोहचले. सहभागी विद्यार्थ्यांनी भविष्यातही वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्विकारण्याचा संकल्प व्यक्त केला.


TODAY

गोंदिया, गुरुवार, ६ जुलै २०२३

सकाळ Green Day Initiative

संगोपन, संवर्धनाचाही केला संकल्प; सकाळ 'ग्रीन डे' उपक्रमावर कौतुकाची थ

वृक्षलागवडीसाठी सरसावले हजारो हा

वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता वृक्षारोपण गरजेचे आहे. 'सकाळ'ने उचललेले हे पाऊल खरोखरच प्रशंसनीय आहे. वृक्षारोपण करताना मानवी जीवनासोबत प्राणीमात्रांना उपयोगात येणाऱ्या झाडांच्या रोपांची लागवड करावी.

**-कुलदीप लांजेवार,**
अध्यक्ष, दिनबंधू ग्रामीण विकास संस्था देवरी.



## सामाजिक-प्रेरणादायी :

### ४) अभ्यासिका केंद्र स्थापना वर्धापनदिन आणि यशवंत सत्कार :

दि.१५ ऑगस्ट २०२३

स्थान :- सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र देवरी.

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी आणि नगरपंचायत कार्यालय देवरी यांच्या संयुक्त विद्यमाने संचालीत सार्व.वाचनालय व अभ्यासिका केंद्राच्या स्थापना वर्धापन दिनाचे आयोजन करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे विद्यार्थ्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानार्जनाला प्रोत्साहन देणे आणि शैक्षणिक वातावरण अधिक बळकट करणे हा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना नियमीत अभ्यासाची सवय लागावी, स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळावे तसेच अभ्यासिकेच्या माध्यमातुन ज्ञान, विचार व संस्कार यांची जोपासणा व्हावी हा या उपक्रमाच्या आयोजनाचा हेतु होता.असुन विद्यार्थ्यांमध्ये वाचन व नियमित अभ्यासाची प्रेरणा निर्माण झाली.



## संस्थेचे कार्य

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.संजु उईके, अध्यक्ष, नगरपंचायत देवरी.

मा.सौ.प्रज्ञाताई संगीडवार, उपाध्यक्ष, नगरपंचायत देवरी.

तसेच मा.सर्व नगरसेवक व नगरसेवीका महोदया.

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी आणि नगरपंचायत कार्यालय देवरी यांच्या संयुक्त विद्यमानाने संचालीत सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्राचा स्थापना वर्धापन दिन व यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला या कार्यक्रमात स्थानीक मान्यवरांसह विद्यार्थी, युवक, तसेच पालक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अभ्यासिका केंद्रातुन शिक्षण घेऊन विविध स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशोगाथेमुळे उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आणि शिक्षणाच्या माध्यमातुन प्रगती करण्याचा आत्मविश्वास वाढला आणि सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्राचे महत्व अधिक अधोरेखीत झाले असुन विद्यार्थ्यांमध्ये वाचन व नियमित अभ्यासाची प्रेरणा निर्माण झाली.



## ग्राम स्वच्छता :-

### ५) ''स्वच्छता ही सेवा उपक्रम''

दि.०१ ऑक्टोंबर २०२३

स्थान :- देवरी नगरपंचायत क्षेत्र

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या माध्यमातुन शासनाच्या ''स्वच्छता ही सेवा'' या उपक्रमात सहभागी होण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण व नागरी भागात स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, नागरीकांमध्ये स्वच्छतेची सवय निर्माण करणे आणि निरोगी व स्वच्छ गांव घडविण्यासाठी सामुहिक प्रयत्न हा होता. स्वच्छता ही केवळ एक मोहिम नसुन ती प्रत्येक नागरीकाची जबाबदारी आहे, ही भावना समाजात रुजवणे, युवक व महिलांना स्वच्छतेच्या कार्यात सहभागी करुन घेणे आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी शहर घडविण्यासाठी लोकसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतु होता.

**सहभागी मान्यवर :**

मा.श्री.संजु उईके, अध्यक्ष, नगरपंचायत देवरी

मा.श्रीमती प्रज्ञाताई संगीडवार, उपाध्यक्ष, नगरपंचायत देवरी

मा.श्री.संजय दरवडे, नगरसेवक, नगरपंचायत देवरी

मा.श्री.अजय पाटनकर, मुख्याधिकारी, नगरपंचायत देवरी

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या माध्यमातुन शासनाच्या ''स्वच्छता ही सेवा'' या महत्वपुर्ण उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातुन नगरातील विविध सार्वजनिक ठिकाणी, रुग्णालय, रस्ते, शाळा परिसर व इतर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमात संस्थेचे पदाधिकारी, शाळकरी विद्यार्थी, नगरपंचायत पदाधिकारी तसेच इतर नगर वासीयांनी मोठया उत्साहाने सहभाग घेत स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले स्वच्छतेबाबत जनजागृती करुन नागरिकांमध्ये स्वच्छ आणि निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्यात आले. या उपक्रमामुळे नगरात स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश पोहचला असुन नागरीकांमध्ये स्वच्छता राखण्याबाबत जागरुकता निर्माण झाली हेच या कार्यक्रमाचे खरे साफल्य ठरले.

# काही क्षणचित्रे


राष्ट्रीय सेवा योजना
पंचायत देवरी


सार्व. वाचनालय अभ्यासिका
DINBANDHU
GPS Map Camera
Deori,MH,India
Market Lane, Deori, Deori, 441901, MH, India
Lat 21.072347, Long 80.367008
10/01/2023 09:02 AM GMT+05:30
Note : Captured by GPS Map Camera


GPS Map Camera
Deori,MH,India
Market Lane, Deori, Deori, 441901, MH, India
Lat 21.072332, Long 80.367039
10/01/2023 08:22 AM GMT+05:30
Note : Captured by GPS Map Camera

## आरोग्य-सामाजिक :-

### ६) "निक्षय मित्र बनूया-टी.बी. मुक्त भारत घडवूया" :

दि.१९ आक्टोबर २०२३, स्थान :- ग्राम पंचायत कार्यालय, म्हैसुली

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या माध्यमातुन केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियानात "निक्षय मित्र" म्हणून सहभागी होण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे क्षयरोगग्रस्त रुग्णांना सामाजिक, पोषण व माणसीक आधार देणे तसेच क्षयरोगाबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे. समाजातील विविध घटकांना या अभियानात सहभागी करुन "टी.बी. मुक्त भारत" या राष्ट्रीय उद्दीष्टपूर्तीसाठी योगदान देणे, रुग्णांप्रती संवेदनशीलता वाढविणे आणि निरोगी समाज घडविण्यासाठी लोकसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतु होता.

**उपस्थिती मान्यवर :**

मा.श्री.जगणजी सलामे, सरपंच, ग्राम पंचायत म्हैसुली
मा.श्री.डॉ.ललित कुकडे, तालुका आरोग्य अधिकारी, देवरी
मा.श्री.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी
मा.श्री.संजय भगवतकर, क्षयरोग पर्यवेक्षक, देवरी

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी च्या वतीने केंद्र शासनाच्या टी.बी. मुक्त भारत अभियानाअंतर्गत "निक्षय मित्र" म्हणुन सहभागी होत क्षयरोगग्रस्त रुग्णांना पोषणात्मक मदत म्हणुन जिवनावश्यक साहित्याचे फुड किटचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत रुग्णांपर्यंत पोषण आहार किट पोहचवुन त्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी हातभार लावला. तसेच क्षयरोगाबाबत जनजागृती करुन वेळेवर उपचार घेण्याचे महत्वही नागरीकांना पटवुन देण्यात आले. समाजाच्या सहकार्याने व संस्थेच्या प्रयत्नातुन हा उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला आणि टी.बी. मुक्त समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल म्हणुन या कार्यक्रमाचे साफल्य लाभले.





## आरोग्य - सामाजिक :

### ७) ''दमा या आजारावर मोफत औषध वितरण शिबीर :

दि.२८ आक्टोंबर २०२३

स्थान :- मॉ धुकेश्वरी मंदिर सभागृह, देवरी

### आयोजनाचे उद्देश :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी बहुल नक्षलग्रस्त भागात दमा या आजाराबाबत जनजागृती निर्माण करणे व दमाग्रस्त रुग्णांना आरोग्य सहाय्य मिळावे या उद्देशाने कोजागीरी पोर्णिमाचे औचीत्य साधुन मोफत औषध वितरण शिबीराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या उपक्रमाच्या माध्यमातुन रुग्णांना आवश्यक औषध उपलब्ध करुन देत त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करणे, तसेच समाजात निरोगी जीवनशैली व आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख हेतु आहे.

### विशेष उपस्थिती :

मा.श्री.ॲड.प्रशांत संगीडवार, अध्यक्ष, मॉ धुकेश्वरी मंदिर समिती देवरी

मा.श्री.सुशिल शेंद्रे, सचिव, मॉ धुकेश्वरी मंदिर समिती देवरी

मा.श्री.डॉ.सुनिल समरीत, अध्यक्ष, सुवर्णप्राशन फाऊंडेशन

मा.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष-दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

### आयोजनाचे साफल्य :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दमा (अस्थमा) या आजाराबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने मोफत औषध वितरण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात आसपासच्या तसेच स्थानीक जिल्यातील जवळ-जवळ ४४५ रुग्ण सहभागी झाले होते. त्या सर्वांची चिकित्सा करुन ३२७ रुग्णांना दमा या आजाराचे मोफत औषध उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरण करुन आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण व नागरी क्षेत्रातील अनेक नागरीकांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# काही क्षणचित्रे




सुवर्णप्राशन
दिनबंधु
यांच्या संयुक्त विद्यमाने
कोजागिरी पौणिमा निमित्त
मोफत
दमा या आजाराचे औषध वितरण शिबीर
आजाराची लक्षणे: जुनाट सर्दी, दमा, खोकला, एलर्जी वर आयुर्वेदिक उपचार
28 ऑक्टोबर 2023
अधिक माहितीसाठी संपर्क करा:
मो. 94041 45145
मो. 72189 42626
आयोजक: माँ धुकेश्वरी मंदिर समिति, देवरी
स्थळ: माँ धुकेश्वरी मंदिर सभागृह, एन.एच.०६, देवरी


दमा या आजाराचे औषध वितरण शिबीर
28 ऑक्टोबर 2023



## सामाजिक :

### ८) आमची दिवाळी वंचितांसाठी :

दि.१३ नोव्हेंबर २०२३

स्थान :- ग्राम-जपकसा, ता.देवरी, जि.गोंदिया

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी "आमची दिवाळी वंचितांसाठी" हा उपक्रम आयोजीत करण्यामागील प्रमुख उद्‌देश म्हणजे समाजातील गरजु, वंचित व दुर्बल घटकांपर्यंत दिवाळीच्या आनंदाचा वाटा पोहचविणे हा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातुन गरजु कुटूंबाना फराळ, कपडे, मिठाई, क्रिडा व शैक्षणिक साहित्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करुन त्यांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. तसेच समाजातील सक्षम घटकांनी वंचित बांधवांच्या मदतीसाठी पुढे यावे व समाजात सहकार्य, संवेदनशीलता आणि समाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागावी हा या उपक्रमाचा हेतु होता.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्रीमती शेवंताबाई गहाणे, सरपंच, ग्रा.पं.उचेपुर
मा.श्री.कमलजी घावडे, उपसरपंच, ग्रा.पं.उचेपुर
मा.श्री.राजेंद्रजी अंबादे, सदस्य, ग्रा.पं.उचेपुर
मा.श्री.राजेश रामटेके, संचालक, गोंदिया जिल्हा शिक्षक सह.पत संस्था

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया जिल्हयातील देवरी तालुक्यातील आदिवासी बहुल नक्षलगस्त भागातील महाराष्ट्र व छत्तीसगढ या राज्याच्या सीमेलगत असलेल्या ग्राम जपकसा येथे "आमची दिवाळी वंचितांसाठी" हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाच्या माध्यमातुन समाजातील गरजु व वंचित कुटूंबांना दिवाळीचा आनंद मिळावा या हेतुन विविध जीवनावश्यक वस्तू, फराळ, मिठाई, क्रीडा व शैक्षणिक साहित्य तसेच इतर साहित्याचे वितरण करण्यात आले. समाजातील वंचित बांधवांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलविण्याचा प्रयत्न या उपक्रमातुन करण्यात आला. समाजातील सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची भावना हा उपक्रम यशस्वीपणे सपन्न झाला. वंचित कुटूंबासोबत दिवाळीचा आनंद वाटण्याची संधी मिळाल्याने या उपक्रमाचे खरे साफल्य प्राप्त झाले.

# काही क्षणचित्रे




आमची
दिवाळी
वंचितासाठी
नम्र आवाहन
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमची दिवाळी वंचितांसाठी या उपक्रमाअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासीबहुल नक्षलग्रस्त भागात असणाऱ्या जवकसा या गावात वास्तव्यास असणाऱ्या कुटुंबांना दि.१३ नोव्हेंबर २०२३ रोज सोमवार ला सकाळी ९.०० वा. येथील गरजू कुटुंबाना नवीन कपडे, फराळ, मीष्ठान आणि विद्यार्थ्यांना शालेय व व क्रीडा साहित्याचे वितरण करून एका अनोख्या पध्दतीने दिवाळी हा सण सर्व मित्र परिवारांच्या उपस्थित साजरा करत आहोत. आपणही शक्य असेल तर या लोकाभिमुख उपक्रमात सहभागी व्हावं ही विनंती.
शुभ दिवाळी





नवराष्ट्र

समाजकार्य • अतिसंवेदनशील भागातील गावात गोरगरिबांना फराळ, कपडे, क्रीडा साहित्य वाटप

# जंगलव्याप्त जपकसात 'आमची दिवाळी वंचितांसाठी'

देवरी, (ता.प्र.). दिनबंधू ग्रामीण विकास संस्था देवरी आणि सुवर्णप्राशन फाउंडेशन साकोली तसेच मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने मागील 3 वर्षांपासून लोकसहभागातून ₹आमची दिवाळी वंचितांसाठी₹ 2023 या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. या लोकाभिमूख उपक्रमांतर्गत 13 नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील महाराष्ट्र आणि छत्तीसगड सिमेलगत असलेल्या अतिसंवेदनशील

दिवाळीचा सण आनंदात साजरा करता यावा, यासाठी जपकसा गावात उपक्रम राबविण्यात आला. शैलेशकुमार अजमेरा

ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार, रोहित ब्राम्हणकर, राजेश अंबादे, रवी अंबादे, युवराज कोल्हारे, महेश रहांगडाले, निखिल झिंगरे, किशोर ...म, रंजीत धमगाये, यदु बक्चोरिया, ...द्र सांडील, संदीप महोबिया, दिलीप ...रवाडे, सुवर्णप्राशन फाऊंडेशनचे ...व डॉ. रुपेश परशुरामकर, हितेश्री ...रीत, दिनबंधू ग्रामीण विकास ...थेच्या सचिव कल्याणी लांजेवार, सदस्य प्रगती लांजेवार आदी उपस्थित होते. याप्रसंगी जपकसा येथील या उपक्रमात जवळपास गरजू 47 कुटुंबातील 267 महिला-पुरुष, लहान बालक, दिव्यांग बंधू, वृद्ध नागरिक प्रमुखांना नवीन कपडे, फराळ व मिष्ठान या साहित्याचे वितरण करण्यात आले. बालकांना नवीन कपड्यांसह शैक्षणिक साहित्य,गावातील कबड्डी संघातील तरुणांना कबड्डी या खेळाचे पोशाख संच, वितरीत करून अनोख्या रुपात दिवाळी हा सण साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन रंजीत धमगाये, प्रास्ताविक चेतन उईके तर समारोपीय मनोगत शैलेशकुमार अजमेरा यांनी केले.

यशस्वीतेसाठी जपकसा येथील मुख्याध्यापक सुजीत बोरकर, आशासेविका माधुरी मुलेटी, किरणकुमार रामटेके, सितेशकुमार ईश्वर, हर्षवर्धन मेश्राम, सुरेश राठी, मनोज कोडापे आदींनी सहकार्य केले.

## नागरिकांकडून उपक्रमाचे कौतुक

ग्राम जपकसा येथे अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम असल्याने लहान बालकांसह ज्येष्ठ वृद्ध महिला आणि पुरुष मंडळी यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद होता. तर दिवाळी साजरी करण्यापासून वंचित असणाऱ्या या कुटुंबाचा आनंद बघून एक वेगळा आत्मानंद मिळत असल्याच्या भावना आयोजकांकडून व्यक्त केल्या गेल्या. गत 3 वर्षांपासून संस्थेला मिळत असलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे संपन्न होत असल्याचेसुद्धा यावेळी सांगण्यात आले.

Gondia Edition
...6 November 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com



लोकमत

नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप : तीन वर्षांपासून आयोजन

# जपकसा येथे 'आमची दिवाळी वंचितांसाठी' उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारा भारतीय संस्कृतीतील दिवाळी हा महत्त्वाचा सण. हा सण समाजातील प्रत्येक जण आपल्या सोयीप्रमाणे साजरा करून आनंद मिळवून घेतो. परंतु, समाजात असेही काही लोक असतात, जे हा सण साजरा करण्यापासून वंचित असतात. अशा वंचित कुटुंबांसोबत सहभागी होऊन त्यांच्या आनंदात आनंद मिळवून घेण्यासाठी दीनबंधू ग्रामीण विकास संस्था, देवरी आणि सुवर्णप्राशन फाउंडेशन, साकोली व मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने मागील तीन वर्षांपासून लोकसहभागातून 'आमची दिवाळी वंचितांसाठी' या उपक्रमाचे आयोजन जपकसा येथे सोमवारी (दि. १३) करण्यात आले होते.

देवरी तालुक्यातील महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेलगत असलेल्या अतिसंवेदनशील आदिवासीबहुल, नक्षलग्रस्त क्षेत्रातील उचेपूर ग्रामपंचायतीअंतर्गत जपकसा या गावात हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी शैलेशकुमार अजमेरा, सरपंच शेवंता गहाणे, कमल घावडे, रावजी मुलेटी, शिवाजी गोटा, डॉ. सुनील समरीत, बिरसा ब्रिगेडचे संघटक चेतन उईके, जि. प. शिक्षक पतसंस्थेचे संचालक राजेश रामटेके, कुलदीप लांजेवार, रोहित ब्राह्मणकर, राजेश अंबादे, रवी अंबादे, मुख्याध्यापक युवराज कोल्हारे, महेश रहांगडाले, निखिल झिंगरे, किशोर नेताम, रंजित धमगाये, यदु बक्चोरिया, नरेंद्र सांडील, संदीप महोबिया, दिलीप अंबरवाडे, डॉ. रूपेश परशुरामकर, हितेश्री समरीत, कल्याणी लांजेवार, प्रगती लांजे... उपस्थित होते. कार्यक्रमाचे सं... रंजित धमगाये यांनी केले. प्र... चेतन उईके यांनी मांडले. ... शैलेशकुमार अजमेरा यांनी...

कार्यक्रमात शैलेश अजमेरा, शेवंता गहाणे, कमल घावडे, रावजी मुलेटी, शिवाजी गोटा, डॉ. सुनील समरीत व अ...

## कार्यक्रमासाठी यांनी केले सहकार्य

■ या कार्यक्रमासाठी जपकसा येथील मुख्याध्यापक सुजित बोरकर, आशा सेविका माधुरी मुलेटी, किरणकुमार रामटेके, सीतेशकुमार ईश्वर, हर्षवर्धन मेश्राम, सुरेश राठी, मनोज कोडापे यांच्यासह ...

## ४७ कु...

Hello Gondia
Page No. 3 Nov 15
Powered by: ereleg...





# संस्थेचे कार्य

## शिक्षण :-

### ९) सावित्रीबाई फुले जयंती व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :

दि.०३ जानेवारी २०२४

सीान :- सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या वतिने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनाचे आयोजन करण्यामागील मुख्य उद्‌देश म्हणजे त्यांच्या महान कार्याची आठवण करुन देणे आणि समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखीत करणे हा आहे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समानता आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य समाजासाठी प्रेरनादायी आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करुन विशेषतः मुलींच्या शिक्षणाबाबत जागरुकता निर्माण करणे, तसेच समाजात समता शिक्षण आणि प्रगतीची भावना दृढ करणे हा या कायक्रमाचा मुख्य हेतु होता.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्री.राम वाघ सर, संस्थापक आकार फाऊंडेशन नागपूर
मा.कु.गिता मुळे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन देवरी
मा.श्री.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी






### आयोजनाचे साफल्य :

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या वतिने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिना निमित्य विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्व, अभ्यासाची योग्य पध्दत, नियोजन व यश मिळविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले तसेच सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण व समाजसुधारणा कार्याचा गौरव करुन विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांपासुन प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत जागरुकता आणि स्पर्धा परीक्षांबाबत प्रेरणा निर्माण झाल्याने या उपक्रमाचे खरे साफल्य लाभले.



लोकमत

राम वाघ : स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम

**विद्यार्थ्यांनो, स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासोबत स्वत:तील कौशल्य आणखी विकसित करा**

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : सध्याच्या आधुनिक व स्पर्धेच्या युगात शासकीय किंवा खासगी क्षेत्रात असो युवकांना रोजगार मिळणे कठीण झाले आहे. दिवसेंदिवस स्पर्धेच्या युगात शासकीय विभागात नोकरी मिळविण्यासाठी प्रत्येक सुशिक्षित बेरोजगार युवक अभ्यासात मग्न आहे; परंतु, दिवसेंदिवस अभ्यास करून नैराश्येच्या भावनेत जात आहे. स्पर्धा परीक्षेचा किंवा इतर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना घाबरून किंवा नकारात्मक विचार करून चालणार नाही तर स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना स्वत:मधील कौशल्य ओळखून त्याला विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे आकार फाउंडेशन नागपूरचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राम वाघ यांनी सांगितले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राम वाघ.

स्थानिक नगर पंचायत कार्यालय देवरी, दीनबंधू ग्रामीण विकास संस्था देवरीद्वारा संचालित सार्वजनिक वाचनालय आणि अभ्यासिका केंद्र येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम गुरुवारी घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी नगरसेविका पिंकी कटकवार, पोलिस उपनिरीक्षक गीता मुळे, कुलदीप लांजेवार, सचिव कल्याणी लांजेवार, शिवाजी कदम, पोलिस कॉन्स्टेबल नागदेवे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी गीता मुळे यांनी आपल्या जीवनातील शालेय शिक्षणापासून ते स्पर्धा परीक्षेच्या यशापर्यंतच्या प्रवासाचा अभ्यासिका केंद्रातील विद्यार्थ्यांसमोर उलगडा करून स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्याचा कानमंत्र विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार यांनी मांडले. संचालन हर्षवर्धन मेश्राम यांनी केले तर आभार मंगला गुरुमार्गी यांनी मानले. कार्यक्रमासाठी सुरेश राठी यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



नवराष्ट्र

यशोमंत्र • प्रा. राम वाघ यांचे प्रतिपादन; देवरी येथे बालिका दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**स्पर्धा परीक्षेसोबतच कौशल्य विकसित करा**

देवरी, (ता.प्र.). आजच्या आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात शासकीय किंवा खासगी क्षेत्रात युवकांना रोजगार मिळणे कठीण झाले आहे. ...

**विद्यार्थ्यांना दिला अभ्यासमंत्र**



देशोन्नती

**विद्यार्थ्यांनो स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासोबत स्वतःमधील कौशल्य विकसित करा : प्रा.राम वाघ**

देशोन्नती वृत्तसंकलन...

देवरी ▪ सध्याच्या आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात असो युवकांना रोजगार मिळणे कठीण झाले आहे,दिवसेंदिवस स्पर्धेच्या युगात शासकीय विभागात नौकरी मिळविण्यासाठी प्रत्येक सुशिक्षित बेरोजगार युवक अभ्यासात मग्न आहे परंतु दिवसेंदिवस अभ्यास करून नैराश्याच्या भावनेत जात आहे परन्तु स्पर्धा परीक्षेचा किंवा इतर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना घाबरून किंवा नकारात्मक विचार करून चालणार नाही तर स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतांना स्वतःमधील कौशल्य ओळखून त्याला विकसित करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आकार फाऊंडेशन नागपूर चे संस्थापक अध्यक्ष आणि प्रसिद्ध व्याख्याते प्रा.राम वाघ यांनी केले.

स्थानीक नगरपंचायत कार्यालय देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी द्वारा संचालित सार्वजनिक वाचनालय आणि अभ्यासिका केंद्र येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती अर्थातच बालिका दिवस निमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून केले. पुढे त्यांनी महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपली ध्येयपूर्ती करत आपल्या पोटाची व्यवस्था करून सामाजिक कार्यात थोडासा खारीचा वाटा देता येईल का यावर सुद्धा आजच्या युवकांनि चिंतन करावे असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. यावेळी या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून नगरपंचायत देवरी च्या नगरसेविका सौ.पिंकीताई कटकवार, पोलीस उपनिरीक्षक कु.गीता मुळे यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदिप लांजेवार, सचिव सौ.कल्याणी लांजेवार, शिवाजी कदम, पोलिस कॉन्स्टेबल नागदेवे उपस्थित होते. दरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दरम्यान विशेष अतिथी म्हणून उपस्थित पोलीस उपनिरीक्षक कु.मुळे यांनी आपल्या जीवनातील शालेय शिक्षणापासून ते स्पर्धा परीक्षेच्या यशापर्यंतच्या प्रवासाचा अभ्यासिका केंद्रातील विद्यार्थ्यांसमोर उलगडा करून स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्याचा अभ्यासमंत्र आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष कुलदिप लांजेवार, संचालन हर्षवर्धन मेश्राम तर आभार मंगला गुरुमार्गी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश राठी यांच्यासह अभ्यासिका केंद्रातील अभ्यासकांनी आणि संस्थेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.



## शिक्षण -सामाजिक :

### १०) स्पर्धा परीक्षेतील यशवंत विद्यार्थी सत्कार :

दि.२३ मार्च २०२४

स्थान :- सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या वतिने स्पर्धा परीक्षेमध्ये ग्रामीण भागातील यश संपाद करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा "यशवंत सत्कार कायक्रम" आयोजीत करण्यामागील मुख्य उद्‌देश म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करणे आणि इतर युवकांना स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरीत करणे हा आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड वाढविणे, स्पर्धा परीक्षांबाबत जागरुकता निर्माण करणे आणि यशस्वी विध्यार्थ्यांचे अनुभव व मार्गदर्शन इतर विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवीणे हा या कार्यक्रमाचा महत्त्वपुर्ण हेतु होता.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्री.के.सी.शहारे, सेवा निवृत्त मुख्याध्यापक देवरी

मा.श्री.डॉ.अरुण झिंगरे, प्राचार्य, म.भा. पटेल महाविद्याल देवरी

मा.श्री.कुलदिप लांजेवार, अध्यक्ष-दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

मा.श्री.चेतन उईके, विश्वस्त, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

मा.चि.हेमकृष्ण पिसदे, सत्कारमुर्ती



**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने स्पर्धा परीक्षामध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या यशवंत सत्कार कार्यक्रम उत्साहपुर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन आदिवासी बहुल ग्रामीण गोंदिया जिल्हयातील देवरी तालुक्यातील ग्राम चिचेवाडा या गावातील चि.हेमकृष्ण पिसदे या विद्यार्थ्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि राज्य सेवा या सारख्या अन्य परीक्षेत यश मिळविल्याबद्दल त्याचा सन्मान करुन त्याच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी यशवंती विद्यार्थ्यांने आपल्या यशामागील अनुभव आणि अभ्यासाचे मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थ्यांना संवादात्मक सांगीतले. त्यामुळे अभ्यासिका केंद्रातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणा मिळाली. या यशवंत विद्यार्थ्याचा यशाचा गौरव करुन शिक्षण व स्पर्धा परीक्षांबाबत सकारात्मक प्रेरणा निर्माण करण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे खरे साफल्य प्राप्त झाले.



## शिक्षण - आरोग्य :-

### ११) मानसीक रोग तज्ञ मार्गदर्शन शिबीर:

दि.१० सप्टेंबर २०२३ ते १५ मार्च २०२४

स्थान : देवरी प्रकल्प कार्यालया अंतर्गत सर्व अनुदानित व शासकीय आश्रमशाळा आणि शासकीय आदिवासी मुले-मुलींचे वसतीगृह.

**आयोजनाचे उद्देश :**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देवरी प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहात मानसिक रोग तज्ञ मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे व मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे. विद्यार्थ्यांना ताण-तणाव, नैराश्य, भीती व चिंता यांसारख्या समस्यांवर योग्य मार्गदर्शन मिळवून देणे. अभ्यासातील एकाग्रता वाढविणे, आत्मविश्वास विकसित करणे व सकारात्मक विचारसरणी निर्माण करणे. किशोरवयीन मुला-मुलींमध्ये उद्भवणाऱ्या मानसिक व भावनिक बदलांबाबत समुपदेशन व मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांना मोबाईल, सोशल मीडिया व इतर व्यसनांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती करणे. विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य सल्ला व मानसिक आधार उपलब्ध करून देणे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, सुदृढ मानसिकता व निरोगी जीवनशैली घडविणे. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळून त्यांचे मानसिक स्वास्थ्य बळकट करण्यास मदत होणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

**विशेष उपस्थिती :**

मा.श्री.डॉ.सुनिल समरीत,
मानसिक रोगतज्ञ

मा.श्री.कुलदिप लांजेवार,
अध्यक्ष-दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

## आयोजनाचे साफल्य :

एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देवरी प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत जनजागृती व मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने मानसिक रोग तज्ञ मार्गदर्शन शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये तज्ञांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व, ताण-तणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचारसरणी, अभ्यासातील एकाग्रता वाढविण्याचे उपाय तसेच मोबाईल व सोशल मीडियाच्या अति वापरामुळे होणारे परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून आपल्या शंका निरसन करून घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण झाली असून त्यांना सकारात्मक व आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्यासाठी प्रेरणा मिळाली.



# संस्थेचे कार्य









## संस्थेचे कार्य




PARTY


माझी दिनचर्या






दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी, जि. गोंदिया
मानसिक रोग तज्ञ मार्गदर्शन शिबीर

## संस्थेचे यश


dinbandhu_gramin_vikas_sanstha
Dinbandhu Gramin Vikas Sanstha Deori
dgvsdeori@gmail.com
dinbandhugraminvikassanstha.org
ISO 9001:2015
जिल्हा परिषद कार्यालय भंडारा अंतर्गत सन–२०२३ मध्ये गट “क” मधील कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदाकरिता घेण्यात आलेल्या परिक्षेत यश संपादन करुन, सदर पदाच्या परिक्षेत भंडारा जिल्ह्यातुन “प्रथम” येऊन उत्तुंग भरारी घेणाऱ्या, सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र देवरी येथील अभ्यासक विद्यार्थी यशवंत चि.सुशिल किशोर टेंभुर्णे यांच मन:पुर्वक अभिनंदन!
चि.सुशिल किशोर टेंभुर्णे
शुभेच्छुक
DINBANDHU
Gramin Vikas sanstha, Deori
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी
नगरपंचायत कार्यालय, देवरी
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी
सर्व अभ्यासक सार्व. वाचनालय व अभ्यासिका केंद्र देवरी.


www.dinbandhugraminvikassanstha.org
ISO 9001:2015
नगरपंचायत कार्यालय, देवरी
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था,देवरी
यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसहभागातून संचालित
सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र, देवरी
येथील विद्यार्थ्यांची स्पर्धा परिक्षेत उत्तुंग भरारी..
अनमोल कुंडभरे
SRPF चंद्रपुर
संजय मडावी
SRPF चंद्रपुर
वैभव हुर्रे
NIACL ASSISTANT
यशवंत विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन
आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा...
शुभेच्छुक : नगरपंचायत कार्यालय, देवरी / दिनबंधु ग्रामीण विकास संस्था,देवरी

## संस्थेचे यश


नगरपंचायत देवरी आणि दिनबंधु ग्रामीण विकास संस्था,
देवरी ता. देवरी,जि.गोंदिया द्वारा संचालित
चि. हर्षल योगेश शेंडे
हार्दिक अभिनंदन
सार्वजनीक वाचनालय व अभ्यासिका केंद्रातील यशवंतांच्या शिरपेचात IBPS अंतर्गत मार्च-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या भारतीय खाद्य निगम विभागाच्या परीक्षेत आपल्या परिश्रमाला यशाच्या स्वरुपात रुपांतर करून घेणारे यशवंत चि.हर्षल योगेश शेंडे मु.देवरी, ता.देवरी, जि.गोंदिया या विद्यार्थ्यांची Assistant Gred-3 या पदासाठी नियुक्ती झाली आणि ही आमच्या करिता खूप अभिमानाची बाब आहे.
केंद्रशासनाच्या भारतीय खाद्य निगम विभागात आपली निवड झाल्याबद्दल आपले सर्व घटकांकडून मनस्वी अभिनंदन....!!
शुभेच्छूक
✲ नगरपंचायत कार्यालय,देवरी, ✲ दिनबंधु ग्रामीण विकास संस्था,देवरी
✲ सर्व अभ्यासक सार्व.वाचनालय व अभ्यासिका केंद्र देवरी.


MINISTRY OF HOUSING AND URBAN AFFAIRS GOVERNMENT OF INDIA
LiFE Lifestyle for Environment
G20
my GOV मेरी सरकार
स्वच्छ दिवाली शुभ दिवाली
A Swachh Bharat Mission 2.0 Initiative
प्रमाणित किया जाता है कि
Dinbandhu Gramin Vikas Sanstha
ने 06 से 12 नवंबर 2023 तक हस्ताक्षर अभियान में भाग लिया है।
3654837934
November, 09 2023
स्वच्छ भारत मिशन 2.0 की एक पहल

नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

DINBANDHU

Gramin Vikas sanstha, Deori

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

ता.देवरी जि.गोंदिया.

ISO 9001:2015